आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१८ एप्रिल २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर झाल्याच्या मुद्द्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज रात्री साडे ८ वाजता देशवासियांना संबोधित करणार

- केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ, प्रधानमंत्री ग्राम सड़क योजनेला ३ वर्ष मुदतवाढ

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित

- ३७१ भारतीय हज यात्रेकरूंचा पहिला जत्था आज सौदी अरेबियात दाखल

आणि

- होर्मुझची सामुद्रधुनी इराणकडून पुन्हा बंद, होर्मुझमध्ये ब्रिटनच्या २ जहाजांवर इराणचा हल्ला

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज रात्री साडे ८ वाजता देशवासियांना संबोधित करणार आहे. महिला आरक्षणाच्या संदर्भातलं घटनादुरुस्ती विधेयक काल लोकसभेत नामंजूर झाल्याप्रकरणी प्रधानमंत्री यावेळी बोलणार आहेत. तमिळनाडूतल्या कोईम्बतूरमध्ये प्रचार सभेत बोलताना त्यांनी ही माहिती दिली. या विधेयकाला विरोध केल्याच्या मुद्द्यावरुन यावेळी त्यांनी द्रमुक आणि काँग्रेसवर टीका केली. महिला आरक्षणाला विरोध का केला हा सवाल द्रमुकच्या नेत्यांना विचारा असं आवाहन त्यांनी तमिळनाडूच्या जनतेला केलं.

<><><><>

सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता २ टक्के वाढवून ६० टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०२६ पासून ही दरवाढ लागू होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाच्या नवीदिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला अशी माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. साडे ५० लाख कर्मचारी आणि ६८ लाखांहून अधिक निवृत्तीवेतन धारकांना याचा लाभ होईल. यामुळं सरकारी तिजोरीवर वर्षाला सुमारे ६ हजार ७९१ कोटी रुपयांचा भार पडणार आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड कॅप्सूल - - -**

*(प्रधानमंत्री ग्रामसडक योजना मार्च २०२८ पर्यंत सुरू ठेवायलाही मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. ग्रामीण कृषी उत्पन्न बाजार समिती, उच्च माध्यमिक शाळा आणि रुग्णालयांना जोडणाऱ्यांना मार्गांचा यात समावेश आहे. या योजनेसाठी ८३ हजार ९७७ कोटींची नव्याने तरतूद करण्यात आली आहे. मैदानी भागातले रस्ते आणि पूल बांधण्यासाठी मार्च २०२८ पर्यंत तसंच डोंगराळ भागातले रस्ते बांधण्यासाठी मार्च २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.*

***- - होल्ड अश्विनी वैष्णव बाइट - - -***

*१२ हजार ९८० कोटी रुपयांच्या हमीसह भारत मेरीटाईम इन्शुरन्स पूल या नावाने देशांतर्गत विमा निधी उभारायला केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली आहे. कोणत्याही आंतरराष्ट्रीय ठिकाणावरून भारतीय बंदरांपर्यंत आणि भारतीय बंदरांपासून कोणत्याही आंतरराष्ट्रीय ठिकाणापर्यंत माल वाहून नेणाऱ्या जहाजांसाठी यामुळे विमा उपलब्ध असेल असं वैष्णव यांनी सांगितलं.*

*आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने आज २४ हजार ८१५ कोटी रुपये खर्चाच्या दोन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी दिली. गाजियाबाद-सीतापूर तिसरी आणि चौथी मार्गिका आणि राजमुंद्र - विशाखापट्टणम तिसरी आणि चौथी मार्गिका या मार्गांचा यात समावेश आहे.)*

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं असून विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशन आज संस्थगित झालं. २८ जानेवारीला या अधिवेशनाला सुरुवात झाली होती.

या अधिवेशनात लोकसभेच्या एकूण ४१ बैठका झाल्या, यात ९३ टक्के कामकाज झालं असं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. अधिवेशनात बारा विधेयकं सभागृहात सादर झाली, यातली ९ विधेयकं मंजूूर झाली. यात वित्त, नादारी कायदे सुधारणा, आंध्रप्रदेश पुुनर्रचना, जनविश्वास तरतुदींमधली सुधारणा आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या संदर्भातल्या विधेयकांचा समावेश आहे. याविषयी संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू म्हणाले

**- - होल्ड किरेन रिजीजू बाइट - -**

राज्यसभेचं कामकाज १५७ तास चाललं, या अधिवेशनात सदस्यांनी आपलं मूल्यवान मत मांडून सभागृहातल्या चर्चेचा स्तर उंचावला असे गौरवोद्गार राज्यसभा अध्यक्ष सीपी राधाकृष्णन यांनी काढले. राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश यांची फेरनिवडही या अधिवेशनात झाली.

<><><><><>

१३१ व्या घटनादुरुस्तीचं विधेयक हे महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी होतं, त्यामुळे हे विधेयक नामंजूर होणं हा विरोधी पक्ष, राज्यघटना आणि देशाचा विजय आहे, असं काँग्रेस महासचिव खासदार प्रियंका गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होत्या.

**- - होल्ड बाईट प्रियांका - -**

या विधेयकाबद्दल विरोधी पक्षांना काहीही माहीत नव्हतं, केवळ एक दिवस आधी विधेयकाचा मसुदा दिला गेला, देशाच्या संघराज्य रचनेला बदलणं आणि लोकशाहीला कमकुवत करण्यासाठीचं हे षड्यंत्र होतं अशी टीका गांधी यांनी केली. हे विधेयक मंजूर झालं असतं तर जातनिहाय जनगणनेची गरज पडली नसती, त्यामुळे सरकारला मनमानी करण्याची संधी मिळाली असती असा आरोपही त्यांनी केला. २०२३ ला मंजूर झालेलं महिला आरक्षण विधेयक तात्काळ लागू करा अशी मागणीही प्रियांका गांधी यांनी केली.

<><><><><>

महिला आरक्षण विधेयकावर काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी केलेल्या टीकेचा भाजप खासदार रवीशंकर प्रसाद यांनी निषेध केला आहे. लोकसभा किंवा विधानसभेत मतदारसंघ पुनर्रचनेशिवाय आरक्षणाची अंमलबजावणी शक्य नसल्याचं ते नवी दिल्ली इथं माध्यमांशी बोलताना म्हणाले. जनगणना करायला बराच वेळ लागत असल्यानं, शेवटच्या प्रकाशित जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना केली जाऊ शकते, असं नमूद करण्यात आलं होतं, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

<><><><><>

३७१ भारतीय हज यात्रेकरूंचा पहिला जत्था आज सौदी अरेबियात पोहोचला, अशी माहिती रियाधमधल्या भारतीय दूतावासानं समाजमाध्यमांद्वारे दिली आहे. यावर्षी हजसाठी एकूण १,७५,०२५ यात्रेकरू सौदी अरेबियाला भेट देतील अशी अपेक्षा अल्पसंख्याक

व्यवहार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. या यात्रेकरूंना उत्तम सेवा देण्यासाठी यंदा मक्का इथं हॉटेल-शैलीतील निवास व्यवस्था भाड्यानं घेण्यात आल्याचंही निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याचा निर्णय इराणने फिरवला असून अमेरिकेकडून इराणच्या बंदरांची नाकेबंदी उठेपर्यंत होर्मुझ अडवणार असल्याचं जाहीर केलं आहे. इस्राएल आणि लेबनॉन मधल्या हिजबोला गटात १० दिवसांचा युद्धविराम जाहीर झाल्यानंतर जगातल्या २० टक्के व्यापारी जहाजांचा हा मार्ग इराणने काल खुला केला होता. मात्र इराण जोपर्यंत अणुकार्यक्रम बंद करण्यासह इतर बाबींवर अमेरिकेबरोबर स्थायी करार करत नाही तोपर्यंत इराणच्या बंदरांची नाकेबंदी कायम राहील, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केल्यानंतर इराणने हे प्रत्युत्तर दिलं.

इराणच्या नौदलाने होर्मुझमधे ब्रिटीश जहाजावर हल्ला केल्याचं ब्रिटनच्या लष्करानं आज सांगितलं. यामुळं २ भारतीय जहाजांनी सामुद्रधुनीच्या आधीच मागे परतण्याचा निर्णय घेतला. यामुळं परराष्ट्र मंत्रालयानं इराणच्या भारतातल्या राजदूतांकडे नाराजी व्यक्त केली. परराष्ट्र सचिवांनी आज या राजदूतांना समन्स बजावून बोलावून घेतलं होतं.

दरम्यान, इराणने अमेरिकेला समृद्ध युरेनियम देण्याचं कबूल केल्याचा ट्रंप यांचा दावा इराणने फेटाळला आहे. इराणचं नौदल शत्रूवर अधिक कडवा प्रहार करण्यासाठी सज्ज आहे, असं इराणचे सर्वोच्च नेते अयतुल्ला मोजताबा खामेनी आज सेनादल स्थापनादिनानिमित्त दिलेल्या संदेशात म्हणाले.

अमेरिका आणि इराण यांच्यातला युद्धविराम येत्या मंगळवारी संपणार असून त्यापूर्वी दोन्ही पक्षात तह होईल अशी आशा पाकिस्तानने व्यक्त केली आहे.

<><><><>

आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय चेन्नई सुपर किंग्जनं घेतला आहे. हैदराबादमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा हैदराबादच्या ९ व्या षटकात ३ बाद ९९ धावा झाल्या होत्या.

दुसऱ्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूवर ६ गडी राखून विजय मिळवला. बेंगळुरूनं पहिल्यांदा फलंदाजी करताना ८ गडी गमावून १७५ धावा केल्या. दिल्ली कॅपिटल्सनं शेवटच्या षटकात १ चेंडू शिल्लक असताना लक्ष्य साध्य केलं आणि सामना जिंकला.

//<><><><><>//